188

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०६/११/२०२३

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.विसयो-०४२३/ प्र.क्र.११५/ पोल-७ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३.

**विषय** :- केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षात भाग-१-Untled खाली मिळणारे बिनव्याजी कर्ज प्राप्त होण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्षास मंजूरी प्रदान करणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-०४२३/ प्र.क्र.११५/ पोल-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३११०११३१२१३९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र.विसयो-०४२३/प्र.क्र ११५/पोल-७**
मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ३१ ऑक्टोबर, २०२३.

**विषय** :- केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षात भाग-१- Untied खाली मिळणारे बिनव्याजी कर्ज प्राप्त होण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्षास मंजूरी प्रदान करणेबाबत.

**संदर्भ** :- **१.** वित्त विभागाचे पत्र क्र. संकिर्ण-२०२३/प्र.क्र.०९/अर्थबळ, दिनांक १२.०४.२०२३.
**२.** या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट, २०२३.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने “राज्यांना भांडवली भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य” या योजनेंतर्गत राज्य सरकारांना भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षाच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात भाग-१ Untied, अंतर्गत उपलब्ध होणा-या केंद्र शासनाच्या कर्जासाठी गृह विभागास संदर्भाधीन पत्रान्वये रु. ५०० कोटी खर्चाचे प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. त्या अनुसार प्रस्ताव वित्त विभागामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

२. या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येणारा निधी अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत करण्यासाठी महालेखापाल व वित्त विभागाच्या मान्यतेने नविन लेखाशिर्ष उघडण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यावर आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाने “राज्यांना भांडवली भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य” या योजनेंतर्गत राज्य सरकारांना भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षाच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात भाग-१ Untied, अंतर्गत उपलब्ध होणा-या केंद्र शासनाच्या कर्जासाठी पुढीलप्रमाणे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

| मराठी | | | इंग्रजी | | |
|---|---|---|---|---|---|
| मागणी क्रमांक | बी-१० | | Demand No. | B-१० | |
| मुख्य लेखाशिर्ष | ४०५५ | पोलीसांवरील भांडवली खर्च | Major Head | ४०५५ | Capital outlay on Police |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उपमुख्य लेखाशिर्ष | ०० | | Sub Major Head | ०० | |
| गौणशीर्ष | २०७ | राज्य पोलीस | Minor Head | २०७ | State Police |
| गटशिर्ष | (०१) | केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत बिनव्याजी कर्ज | Group Head | (०१) | Interest free loan from the Central Government to the states under special assistance scheme for capital investment. |
| उपगटशीर्ष | (०१)(०१) | भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२३-२४ अंतर्गत (योजना भाग-१) पोलीसांच्या प्रशासकीय इमारती / निवासी बांधकामे (केंद्र हिस्सा १०० %) | Sub Group Head | (०१)(०१) | Construction of Administrative /Residential buildings of Police under special assistance to states for capital investment २०२३-२४ (scheme Part-१) (Central Share १०० %) |
| संगणक सांकेतांक | | ४०५५०६८२ | Computer Registration Code | | ४०५५०६८२ |
| उददीष्ट | ५३- | मोठी बांधकामे | object | ५३ | Major Works |

२. सदर कर्जाच्या निधी विनियोगासाठी केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना, अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे. तसेच याबाबत संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

३. केंद्र शासनाच्या "राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य" या योजनेसाठी अंमलबजावणी व समन्वयासाठी सह / उपसचिव (पोल-७) हे नियंत्रक अधिकारी असतील, तर महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास याद्वारे "अंमलबजावणी यंत्रणा" म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. सदर कर्ज योजनेसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना, अटी व शर्तीचे पालन करण्याची व वित्त विभागाने घालून दिलेल्या नियम व दायित्वाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची असेल.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.१४९/का.१४११, दिनांक २१.०८.२०२३, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र ३४५५/अर्थ-११, दिनांक १८.०९.२०२३, महालेखापाल कार्यालयाचा अनौपचारीक संदर्भ क्र. युओआर-३५/२०२३-२४/४२४, दिनांक ५.०७.२०२३ अन्वये प्रदान केलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharahstra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३११०११३१२१३९२९ हा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NARAYAN BIRA MANE

Digitally signed by NARAYAN BIRA MANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=1dfb457576797050f19aafaa495673fc843c789942459cd39fc5561071b4a70c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=79C09BA352C5B3E65B259113F1CDCFAB29FB961D4EA9A24411D7F622D2ED20BF, cn=NARAYAN BIRA MANE
Date: 2023.11.01 11:32:14 +05'30'

**( नारायण बि. माने )**
**कार्यासन अधिकारी, गृह विभाग.**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.
२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
६. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन अधिकारी (व्यय-७/अर्थ-११/अर्थबळ/ऋण व हमी), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कार्यासन अधिकारी, का.. १४६१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय शाखा, मुंबई
१०. निवड फाईल (पोल-७).